महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२४/प्र.क्र.५५९/२०२४/जाहिरात दिनांक: ३० ऑक्टोबर, २०२४

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : सहायक नगररचनाकार, श्रेणी-एक, गट-ब महाराष्ट्र नगररचना आणि मूल्यनिर्धारण सेवा**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक- ०५१/२०२४, दिनांक १० ऑक्टोबर, २०२४**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी सहायक नगररचनाकार, श्रेणी-एक, गट-ब या संवर्गाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रस्तुत संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार व शासनाने कळविलेल्या समतुल्य अर्हता जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका तसेच शैक्षणिक संस्था व उमेदवार यांनी निवेदनाद्वारे Civil and Infrastructure Engineering ही अर्हता Civil Engineering ला समकक्ष अर्हता म्हणून ग्राह्य समजण्याबाबत मागणी केली होती. याबाबत शासन पत्र, नगर विकास विभाग, क्रमांक: नियुक्ती-११२३/ १६६३/प्र.क्र.३६१/नवि-२७, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२४ अन्वये विषयांकित संवर्गाकरीता Civil and Infrastructure Engineering ही अर्हता Civil Engineering ला समकक्ष अर्हता म्हणून ग्राह्य समजण्याबाबत अभिप्राय प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर अर्हताधारक उमेदवारांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याकरीता विषयांकित जाहिरातीस अर्ज सादर करण्याचा सुधारित अंतिम दिनांक खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक | दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक १० नोव्हेंबर, २०२४ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११ नोव्हेंबर, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

२. मूळ विषयांकित जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

३. वयोमर्यादा गणण्याचा दिनांक मूळ जाहिरातीनुसार राहील. तथापि, शैक्षणिक अर्हता अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त ग्राह्य समजण्यात येईल.

४. विषयांकित सवंर्गाची मूळ जाहिरात क्रमांक ०५१/२०२४ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.